# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| ०८/०९/२०१९ | सभेचे कोरम पूर्ण झाल्याने मिटिंगला सुरुवात करण्यात आली. संस्थेचे सभापती श्री रमेश भिवसन पोतदार सो. यांनी प्रास्ताविक करुन पुढिल सुत्र संचालन करण्यासाठी संस्थेचे संचालक श्री. अमृत बाबुराव पवार यांनी करावे असे सांगुन सभेला सुरुवात झाली. कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे ता.जि. धुळे ४८ वी वार्षिक सभेस सन-२०१८-१९ यासाठी उपस्थित राहीलात आपले सर्वांचे मन:पूर्वक स्वागत : स्वागत: करुन भारत मातेच्या रक्षणासाठी सिमेवर, जे भारतीय वीर जवान शहिद झाले त्या जवानांना, तसेच देशातील थोर व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, साहित्यिक, उद्योगभूषण, शिक्षणतज्ञ, कृषि क्षेत्रात काम करणारे कृषितज्ञ, व संस्थेचे सभासद कै. दिलीप गिरधर पवार (धुळे) कै. गिरधर खंडू बोरसे (नंदुरबार) व त्यांचे नातेवाईक तसेच कृषि विभागात काम करणारे कर्मचारी काळाच्या पडद्याआड गेले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत. ही सभा त्यांच्या दुःखात सहभागी आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना! ॥ ॐ. पूर्णमद: पूर्णमिदं, पूर्णात्पुर्णमुदच्यते, पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते॥ ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: | | |
| १. | मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे. | मागील सभेचे प्रोसिडींग संस्थेचे लिपीक श्री जगदिश अरुण पाटील यांनी वाचुन दाखविले. ते योग्य व बरोबर आहे. तरी सर्वांनी टाळ्यांच्या गजरात मंजुर करावे/केले. असे सर्वांनी मत ठरले. ठराव सर्वानुमते मंजुर. |
| २. | सन २०१८-२०१९ चा अहवाल, तेरीज पत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंदसह मंजुरी देणे. | आपल्या संस्थेचे संचालक श्री अमृत बाबुराव पवार यांनी सन २०१८-१९ या वर्षाचा ४८ वा अहवाल तेरीजपत्रक नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक सविस्तर रित्या चांगल्या पध्दतीने वाचुन दाखविले ते सर्वांनी एकमताने टाळ्यांच्या गजरात मंजुर केले. ठराव सर्वानुमते मंजुर |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| ३. | अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देवुन सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे. | आपल्या संस्थेचे संचालक श्री अमृत बाबुराव पवार अंदाजपत्रक वाचुन दाखविले जादा झालेल्या खर्ची नाही सन २०१९-२०२० या वर्षाचे अंदाजपत्रकास एकमताने मंजुरी द्यावी. सर्वांनी टाळ्यांच्या गजरात मंजुर केले<br>असे सर्वानुमते ठरले<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ४. | सन २०१८-२०१९ तपासणी अहवाल त्यावरील पूर्तता अहवाल वाचुन मंजुर करणेबाबत. | आपल्या संस्थेच्या उपसभापती श्रीमती मनिषा दिलीपकुमार देसले यांनी सन २०१८-२०१९ या वर्षाचा तपासणी अहवाल वाचन केले व त्या अहवालातील शकाची पूर्तता सविस्तर पणे मांडणी करुन वाचुन दाखविला. अहवालातील भाग 'अ' 'ब' 'क' च्या शकाची पुर्तता दि. १६/०६/२०१९ च्या विषय ठराव क्र.४ पूर्ण करुन जा.क्र. ४३८/२०१९-२०२० दि. २५/०६/२०१९ रोजी मा. विभागीय सहनिबंधक सो. सहकारी संस्था नाशिक व मा. जिल्हा उपनिबंधक सो. सहकारी संस्था धुळे आणि मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ धुळे यांना मंजुरीसाठी पाठविला आहे. असे सर्वांनी टाळ्यांच्या गजराने व एकमताने मंजुर करावा असे श्रीमती देसले मॅडम विनंती केली व मंजुर केले<br>असे सर्वानुमते ठरले<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ५. | समितीने केलेल्या नफा वाटणी बाबत विचार करणे. | आपल्या संस्थेचे संचालक श्री. अमृत बाबुराव पवार यांनी विषय क्र.५ नफा वाटणी उपविधी क्र. ग:ग-३१ प्रमाणे खालील प्रमाणे विभागणी करुन वाचुन दाखविले.<br>(१) मागील नफा :- नाही — ००<br>(२) दिनांक :- ३१/०३/२०१९ नफा :- — १६,०३,६६१.५५/-<br>एकुण :- — १६,०३,६६१.५५/- |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | (१) राखीव निधी उपविधी नियम ३१.१.२ प्रमाणे २५% = ४००९१५/- |
| | | (२) दि. ३१/०३/१८ शेअर रक्कम रु. ७०६६६२०/- वर |
| | | उपविधी नियम ३१-१३ प्रमाणे लाभांश :- १२% = ८४७९९४/- |
| | | (३) उपविधी अधिनियम १९६५ नुसार बोनस (अधिलाभांश) = ९५०००/- |
| | | (४) प्रशिक्षण निधी = १५०००/- |
| | | एकूण वजा = १३५८९०९/- |
| | | शिल्लक नफा = २४४७५२.७५/- |
| | | एकूण नफा = १६,०३,६६१.७५/- |
| | | वरील प्रमाणे केलेली नफा वाटणी योग्य व बरोबर असल्यास सर्वांनी एकमताने मंजूर करावी व सर्वांनी टाळ्या वाजुन एकमताने मंजूर केले. |
| | | असे सर्वानुमते ठराव |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर |
| | ६. सेवानिवृत्ती सभासदांचा सत्कार करणे. | सेवानिवृत्ती सभासदांच्या सत्कारासाठी सत्कारमूर्ती म्हणून श्री. एस.डी. मानपुरे सो कृषि उपसंचालक / श्री. गोरख काशिनाथ चौधरी सो. तंत्र अधिकारी / व श्री. मोहन सोमा रामोळे कृषि उपसंचालक नंदुरबार. श्री. चंद्रशेखर दौलतराव साठे नान्हेकर यांनी येवुन सत्कार केला. |
| | | (१) श्री. निळकंठ रामदास पाटील. |
| | | (२) श्री. प्रकाश आनंदा पाटील यांचा सत्कार श्री. एस.डी. मानपुरे सो. केला. |
| | | (३) श्री. विकास किसनराव चौधरी यांचा सत्कार श्री. गोरख का. चौधरी सो. यांनी केला. |
| | | (४) श्री. राजेंद्र दशरथ भारती यांचा सत्कार श्री मोहन सोमा रामोळे यांनी केला. |
| | | सर्व ~~सत्कार~~ सत्कारमूर्ती / प्रमुख पाहुणे यांचा सत्कार संस्थेचे सभापती श्री रमेश पाततर सो / उपसभापती श्रीमती. मनिषा देसले यांनी केला व ~~श्री~~ संस्थेचे संचालक श्री अमृत बाबुराव पवार यांनी पाहुण्यांचे आभार मानले. |
| | | असे सर्वानुमते ठराव |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| ७. | वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे. | आपल्या संस्थेकडे सन-२०१९-२०२० या वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी एक सम्मती पत्र आलेले आहे. श्री. धनंजय माधवराव पाटील, प्रमाणीत लेखा परिक्षक सहकारी संस्था जळगांव, यांना लेखापरिक्षक म्हणुन सन २०१९-२०२० निवड करण्यात आली. व लेखापरिक्षण करावे. <br> असे सर्वानुमते ठरले <br> ठराव सर्वानुमते मंजुर |
| ८. | मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनीमय करणे. | आयत्या वेळी आलेला विषय :- कर्जावरील व्याजदर कमी करणेबाबत व भेटवस्तु खरेदीकरणेबाबत वरील विषयासंदर्भात मा. अध्यक्ष ~~[illegible]~~ महोदय यांच्या परवानगीने लेखी स्वरुपात आलेला अर्ज कर्जावरील व्याजदर दिलेल्या पोटनियमानुसार कमी करण्यासाठी परामर्श घेवुन आपल्या संस्थेचा सध्या आजचा व्याजदर कर्जावरील १२%. इतका घेण्यात येतो. तो व्याजदर १०%. करण्यात यावा. असे दिलेल्या पत्र लक्षात घेवुन मा. अध्यक्ष सो. श्री. रमेश भिवसन पोतदार यांनी सर्वांची मते लक्षात घेता संचालक मंडळाशी चर्चा करुन व्याजदर कमी करणे बाबत निर्णय घेवु असे सभासदांना सांगितले. व भेटवस्तु खरेदी करण्याचे सभापती यांना दिले. तसेच आपल्या पतसंस्थेची दरमहा वर्गणी ही आपण रु. १५००/- इतकी घेत आहोत ती वर्गणी रक्कम रु. २०००/- करावी अशी सुचनाही मा. अध्यक्ष श्री. रमेश भिवसन पोतदार सो. यांनी मांडली. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.
## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | सर्व सभासदांनी होय असे सांगितले व धि चर्चा संचालक मंडळासमोर मांडुन करण्यात येईल असे सांगुन सभेस समाप्ती करण्यास श्री अमृत पवार सो यांनी सभेस आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले. सर्व सभासदांनी आवर्जुन हजर राहिले त्यांचे आभार मानले. आपल्या सभेस साऊंड-सिस्टीम दिली त्यांचे आभार मानले. सभेसाठी हॉल, खुर्च्या, टेबल व उत्कृष्ठ अश्या नास्त्याची सोय करुन दिल्याबद्दल वाळकृष्ण मंगल कार्यालय व लॉन्स चे श्री कुलथेदार यांचे आभार मानले. शेवटी भारतमातेला वंदन करुन राष्ट्रगिताने सभेस पुर्णविराम देवुन सभा समाप्त झाली असे जाहिर केले. |
| | | ठराव सर्वानुमते मंजुर |
| | | सर्वानुमते पास। |

अधिकार

वाचले

डी.एम.पाटील
प्रमाणित लेखापरीक्षक
सहकारी संस्था,जळगांव

चिटणीस

सभापती

कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्या. धुळे